# ऋणनिर्देश

''ज्योती लांजेवार यांच्या कवितेचा अभ्यास'' या विषयावर एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी प्रा.डॉ. प्रकाश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली हा लघुप्रबंध लिहिण्याची संधी मिळाली याचा मला विशेष आनंद होत आहे. प्रस्तुत लघुप्रबंधाच्या लेखनाच्या कामी मला अनेकांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले आहे. या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

लघुप्रबंधाचा विषय निश्चित करण्यापासून ते लघुप्रबंधाचे लेखन पूर्ण होईपर्यंत ज्यांचे अनमोल असे सहकार्य लाभले ते माझे मार्गदर्शक गुरूवर्य प्रा.डॉ. प्रकाश कुंभार, माझ्या प्रत्येक लहानसहान प्रश्नांची समाधानकारक आणि उपयुक्त ठरणारी स्पष्टीकरणे सरांच्याकडून मिळालीच पण एखादा अभ्यासविषय मुळापासून कसा अभ्यासावा, कशी चिकित्सा करावी, याची दृष्टी मला सरांच्याकडूनच मिळाली. अत्यंत स्वच्छ, निकोप, मनमोकळा स्वभाव आणि वैचारिक दृष्टी असलेल्या कुंभार सरांनी माझे मानसिकत्व ओळखून जे मला प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

याच बरोबर या प्रबंधाला अनमोल मार्गदर्शन मिळाले ते मराठी विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, तसेच डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, प्रा. हिमांशू स्मार्त, डॉ. रणधीर शिंदे आदी सर्व तसेच तुपेरे सर, नाईकनवरेसर, शिंदेसर शिवाय मी जिथे एम्.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले त्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड मधील माझे गुरूवर्य विभाग प्रमुख, प्रा. संभाजीराव देसाई,प्रा. श्रीरंग जाधव, प्रा. सौ. शोभना रैनाक, प्रा.सौ. सरलादेवी निकम, प्रा. देवीदास गायकवाड, प्रा. तानाजी पाटील, प्रा. मच्छिंद्र सकटे (समाजशास्त्र), प्रा. दिलीपकुमार कसबे (हिंदी), प्रा. कदम सर (जीवशास्त्र) याच बरोबर डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज, कराड मधील प्राचार्य दत्ता कांबळे, प्रा. भीमाशंकर खुळपे, प्रा. शहाजी पाटील, विवेक कुंभारसर तसेच के.बी.पी. कॉलेज ढेबेवाडी मधील प्रा. प्रकाश विष्णू कुंभार,

(गारवडे), प्रा. कृष्णात चव्हाण (माजगांव), प्रा. विजय यादव (काले) या सर्वांच्या प्रेरणेमुळेच मी हा प्रबंध लिहू शकलो. त्यामुळे या सर्व गुरूवर्यांचे मन:पूर्वक आभार. याचबरोबर ज्यांनी मला आपल्या कवितांमधील काही खोचक गोष्टी स्पष्ट करून दिल्या त्या प्रा.डॉ. ज्योती लांजेवार यांचेही आभार.

गुरूवर्यांच्या मार्गदर्शनाबरोबर ज्यांचे पावलो-पावली सहकार्य घ्यावे लागले ते माझे मित्र व मैत्रिणी सचिन अवताडे, प्रकाश नाईक, संतोष बोंगाळे, रामेश्वर कांबळे, सुनिल बुद्धनावळ, महादेव कांबळे, स्मिता कांबळे, ज्योती माने, आदिंनी जो मला मानसिक आधार दिला व अमोल पाटील, निरेश पाटील (नानेगाव खु।।) यांच्या सारख्या मित्रांनी जो आर्थिक मदतीचा हात पुढे केला त्यामुळेच मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो. त्याबद्दल या सर्व मित्रपरिवाराचे मी आभार मानतो.

ज्यांच्या प्रोत्साहनाशिवाय माझं कोणतच यश पूर्णत्वाला जाऊ शकत नाही असे माझे आजोबा श्री विष्णू जोती कुंभार, आजी सौ. तारूबाई विष्णू कुंभार, वडील नामदेव मारूती कुंभार, आई सौ. पंकज नामदेव कुंभार, चुलते श्री. विठ्ठल मारूती कुंभार माझे भाऊ बहिण मंगेश व रूपाली यांचे माझे सर्व नातलग यांचे ही मी आभार मानतो. याचबरोबर कवितेच्या 'रसिका' तुझे ही आभार.

लघुप्रबंधाचे सर्व काम ज्यांनी व्यवस्थित करून दिले त्याबद्दल विष्णू खाडे यांचे मन:पूर्वक आभार.

**– हेमंत नामदेव कुंभार**

---